## प्रकरण पहिले

## मराठी कथेची वाटचाल

मराठी साहित्यातील इतर वाङ:मयाप्रमाणेच कथा वाङ:मय हा देखील आजच्या काळातील एक समृध्द व संपन्न असा वाङ:मय प्रकार आहे. कहाणी, लोककथा, प्राणिकथा, परिकथा, अद्भूतरम्यकथा, अशा अनेक स्थित्यंतरातून आजच्या कथेची जडणघडण झाली आहे. सर्व साहित्यप्रकारात कथा हा वाङ:मय प्रकार मानवी जीवनाशी आणि मानवी मनाशी अगदी जवळ्या असा आहे. प्राचीन काळापासून चालत आलेला हा वाङ:मयप्रकार अगदी बालपणापासून मानवी समाजावर संस्कार करीत आला आहे. लहान असताना आईने सांगितलेली चिऊकाऊची, राजाराणीची गोष्ट असेल, तारूण्यात प्रेमकथांनी केलेली सोबत असेल किंवा प्रौढपणी वास्तव कथाविषयी वाटणारे आकर्षण असेल या सर्वांमुळे आपल्याला जीवनाच्या प्रत्येक क्षणी आनंद दिला आहे. एका अर्थाने या कथा आपल्या मनाला आदर्शाचे, संस्काराचे, परंपरेचे बाधच पुरवित आल्या आहेत.

आपल्या जीवनात किंवा आजूबाजूला घडलेली घटना इतरांना सांगावी या अनिवार इच्छेतूनच माणसाबरोबरच गोष्टीचा जन्म झाला. कथाप्रियता ही मानवी मनाची एक स्वाभाविक प्रवृत्ती आहे. म्हणून सर्व साहित्य प्रकारात कथा हा वाङ:मयप्रकार मानवी जीवनाशी व मनाशी जवळ्या आहे. अनादि काळापासून माणसं गोष्टी सांगत आली आहेत. रामायण, महाभारतातील कांही प्रसंग गोष्टी रूपाने बालमनावर संस्कार होण्यासाठी सांगितले गेले. आणि ही परंपरा एका पिढीकडून दुस-या पिढीकडे अशा अनंत पिढया तोंडीच चालत आली आहे. महानुभाव पंथातील चक्रधर स्वामींनी सांगितलेले दृष्टान्त हया छोटया-छोटया कथाच आहेत.

"लोककथा" त स्त्रियांच्या कहाण्यांना एक स्वतंत्र स्थान आहे. कहाणीतून स्त्रियांचे मन, व्रतवैकल्ये व सामाजिक जीवन अविष्कृत होते.

आपल्या लेकी, सुनांना चांगले वळण लागावे त्यांच्यावर चांगले संस्कार व्हावे म्हणून स्त्रिया कहाणी सांगत असत. स्त्रियांनी सांगितलेल्या या कहाण्या वर्षानुवर्षे टिकून राहिल्या आहेत. आटपाट नगरात सुरु झालेली साठा उत्तरांची ही कहाणी सुफळ होऊन संपते. व मनाला चटका लावून जाते. व्रताचे महत्व, स्त्रिजीवनाचे दर्शन, आणि तिच्यातून प्रगट होणारे मराठी मनाचे व मराठमोळ्या जीवनाचे चित्र परिणामकारक होते. अशा गोष्टींनी विविध रुपे धारण केली आहेत.

लघुकथा या वाङ्मय प्रकाराचा अभ्यास करीत असता कथेच्या व्याख्या अभ्यासने आवश्यक आहे. हरिभाऊंनी कथेला "स्फुट गोष्टी" म्हटले असले तरी लघुकथा असेच तिचे नाव पुढे रुढ झाले. अर्थात आकाराने लहान म्हणजे लघुकथा अशी व्याख्या मात्र करता येणार नाही. एखादी गोष्ट मोठी असली तरी ती लघुकथा असू शकेल. किंवा एखादी गोष्ट लहान असली तरी ती लघुकथा असेलच असे नाही. म्हणजे गोष्टीचा आकार, व्याप्ती, लहान किंवा मोठी कशीही असली तरी लघुकथेची वैशिष्टये तिच्यात असली पाहिजेत. कथेचा अर्थ सांगताना डॉ. प्रल्हाद जोशी म्हणतात, "कथा म्हणजे १. गोष्ट, कहाणी, २. हकीगत, वर्णन ३. टाळ, मृदंग, वीणा इत्यादींच्या सहाय्याने देवादिकांच्या गोष्टी परमार्थ विचाराबरोबर समुदायात सांगणे, ४. केलेले कृत्य, पराक्रम, ५. महत्व वजन, पर्वा ६. भाषण, ७. ग्रंथार्थ, विषय असा कथेचा अर्थ सांगितला आहे."[१] आणि तो अर्थ उचित वाटतो.

लघुकथेत एकच गोष्ट असते. आणि वाचकांच्या मनावर एकच एक संस्कार उत्कटतेने तिला करावयाचा असतो. याविषयी प्रा. ना.सी. फडके म्हणतात, "शक्य तितक्या परिणामकारक रितीने आणि शक्य तेवढया कमी पात्र प्रसंगांच्या सहाय्याने सांगितलेली एकच एक गोष्ट म्हणजे लघुकथा."[२] म्हणजेच कमीतकमी पात्रे आणि कमीतकमी प्रसंग वापरुन थोडया वेळात परिणामकारकरितीने सांगितलेली व ऐकणाऱ्याच्या मनावर एकच एक ठसा उमटविणारी हकीकत म्हणजेच लघुकथा होय.

`एकच एक मूळ कल्पना कथेत असते. आणि तार्किक निष्कर्षासह उद्दिष्ट पूर्तीच्या अनुरोधाने त्या मूळ कल्पनेचा सहज विकास झालेला असतो.` अशी हडसन यांनी लघुकथेची व्याख्या केली आहे. तर वेल्स याने `वीस एक मिनिटांत वाचून संपणारी कथा` म्हणजे आकारमानावर कथेची व्याख्या केली आहे. तर बेक्सच्या मते `लघुकथेचा विषय सर्वस्वी लेखकाच्या मर्जीवर अवलंबून असतो.` तर ओब्रायस म्हणतो, `कथेतील प्रसंगांचा किंवा घटनांचा उपयोग कथाकार किती प्रभावी आणि प्रत्ययकारी करतो हाच कथेचा निकष मानला पाहिजे.` असे म्हटले आहे.

एडगर ॲलन पो या पाश्चिमात्य लेखकाने म्हटले आहे, `कथेत वापरली जाणारी सर्वसाधने व वापरलेल्या क्लृप्त्या वाचकाच्या मनावर एकच एक परिणाम करणा-या असाव्या. म्हणजे कथेत वापरला जाणारा एकही शब्द असा नसावा की ज्यामुळे पूर्वनियोजित संस्काराला बाध येईल.` एडगर ॲलन पो ची ही व्याख्या महत्त्वाची वाटते.

कथा वाङ्:मय हा एक समृध्द वाङ्:मय प्रकार आहे. प्राचीन मराठी वाङ्:मयातून पद्याचे रूप घेऊन मराठी लघुकथा अवतरली. मराठी कथेचा आरंभकाळ इ.स. १८८६ असा ठरतो. हरिभाऊंच्या पूर्वीची कथा एक साधी गोष्ट होती. नियतकालिकांतून ती जागा सापडेल तिथे कादंबरीबरोबर उभी राहू लागली. हरिभाऊंच्या करमणूकीत`स्फूट गोष्ट` प्रसिध्द होईपर्यंत असे चालले होते. म्हणून म.ना. अदवंत म्हणतात, "खरी मराठी लघुकथा `करमणूकी` पासून १८९० पासून सुरु झाली. त्यापूर्वी जवळजवळ स-तर वर्षे ज्या गोष्टी लिहिल्या गेल्या त्यांचे स्वरूप बहुतांशी भाषां-तरित, अनुकरणात्मक व अद्भुतरम्य असेच होते."[3] करमणूकीत ती प्रसिध्द झाल्यावर तिच्या स्वरूपात आमूलाग्र बदल झाला. व वास्तवात तिने प्रवेश केला.

हरिभाऊंनी मराठी कथेला आशय व अभिव्यक्ती प्राप्त करून दिली. व्यक्तिचित्रणांवर भर देणा-या गोष्टी त्यांनी लिहिल्या. दीर्घकथांपेक्षा हरिभाऊंच्या `स्फुट गोष्टी` परिणामकारक झाल्या आहेत. समाजाला बोध देऊन शहाणे करण्याची भूमिका `स्फुट गोष्टी` चे लेखन करण्यामागे असल्याचे जाणवते. त्यांच्या कथेतील

अनुभव साधा सुधा व सर्वसामान्य माणसाच्या व्यवहारातील होता. `काळ तर मोठा कठीण आला` यासारख्या कथेतून स्त्री शिक्षण, विधवा विवाह, बालविवाहाची अनिष्ठता, केशवपनाच्या चालीतील क्रुरता इ. तत्कालीन सामाजिक प्रश्नांचे दर्शन घडते. म्हणूनच "हरिभाऊंनी आर्वाचीन मराठी कथेचा पाया घातला."[४] असे इंदुमती शेवडे म्हणतात. तर भालचंद्र फडके यांच्यामते हरिभाऊ मराठी कथेचे जनक ठरतात.

करमणूकपूर्व काळातील कथांचे स्वरुप जुजबी होते. अद्भुतरम्यतेचा पगडा या काळात मोठया प्रमाणात दिसून येतो. या काळातील कथेला स्वत:चे असे विश्व नव्हते. अव्वल इंग्रजीच्या काळात कांही तुरळक लेखन झालेले आढळते. इ.स. १८०६ मध्ये तंजावर येथील सरफोजी राजे यांनी इसापनीतीचे मराठी भाषांतर करवून `बालबोध मुक्तावली` या नावाने प्रसिध्द केले. हे मराठीत छापलेले पहिले गोष्टीचे पुस्तक होय. डॉ. केरी यांनी श्रीरामपूर येथे वैजनाथ पंडित यांच्याकडून `सिंहासनबत्तिशी`,`हितोपदेश`, व `पंचतंत्र` या गोष्टीरुप ग्रंथाची मराठी भाषान्तरे करुन छापली. राम कोलालकर यांच्या मते विष्णु घनश्याम यांची पहिली कथा `मराठी ज्ञान प्रसारक` या मासिकात नोव्हेंबर १८५४ मध्ये प्रसिध्द झाली. ज्ञान देणे किंवा रंजन करणे हा या पाठीमागचा हेतू होता.

हरिभाऊंच्या कथालेखनास बहर आला असतानाच वि.सी. गुर्जरांनी कथालेखनास सुरुवात केली. त्यांनी मराठी कथेला एक वेगळे वळण लावले. मराठी कथेला लोकप्रिय केले. आपली कथा आकाराने आटोपशीर बनविली. मुखर्जी, हेन्री, जॅकब, मार्क टवेन या लेखकांचा त्यांच्या लेखनावर प्रभाव दिसून येतो. रंजनाचा मार्ग त्यांनी चोखाळला. हरिभाऊंची गोष्ट व फडके यांची लघुकथा यांच्यातला दुवा म्हणजे वि.सी. गुर्जर होय. म्हणून "मराठी लघुकथा अधिक लोकप्रिय करणारे व मराठी कथेला वेगळे वळण लावणारे एक नामांकित कथाकार म्हणजे गुर्जर होय."[५] असे डॉ. जान्हवी सन्त म्हणतात. या कालखंडातील कथा आशय संपन्न झाली होती. पण ख-या अर्थाने तिला स्वतंत्र व्यक्तिमत्व प्राप्त करुन दिले ते दिवाकर कृष्ण, ना.सी.फडके, वि.स. खांडेकर, य.गो. जोशी या नामवंत कथाकारांनी होय.

मराठी कथेला वेगळी दिशा दाखविणारे व नव्या पध्दतीने गोष्टी लिहिणारे कथाकार म्हणून दिवाकर कृष्ण यांचा उल्लेख केला जातो. मराठी कथेची सत्वहीन अवस्थेतून त्यांनी मुक्तता केली. स्वतंत्र आकार, आशय, व्यक्तिमत्व घडवून तिला स्वत:च्या पायावर उभी केली. त्यांच्या कथेमुळेच गोष्ट ही लघुकथा बनली. या बाबत प्रा. भालचंद्र फडके म्हणतात, "दिवाकर कृष्णांची कथा भरात आलेल्या पोफळीसारखी आहे. पिकलेल्या फणसासारखी दरवळणारी आहे. यात शंकाच नाही. म्हणून तर त्यांना नव्या पध्दतीने गोष्टी लिहिणारे पहिले कथाकार म्हटले जाते."[६] आणि ते योग्यच आहे. स्त्री जीवनाच्या व्यथा हा त्यांच्या कथेचा विशेष आहे. त्यांच्या कथेतील नायिका स्वप्नाळू, भावनाप्रधान व काव्यवेडया आहेत. म्हणून

"प्रीती मिळेल का हो बाजारी ।

प्रीती मिळेल का हो शेजारी ।" अशा सारख्या

काव्यपंक्ती त्यांच्या कथातून विखुरलेल्या आढळतात.

मराठी लघुकथा फडके- खांडेकरांनी नावारुपाला आणली. ना.सी.फडके यांनी आपली कथा तंत्रशुध्दता, रेखिवता, डौलदारपणा व सफाईदार भाषा, इ. गुणांनी नटवली. अनेक प्रसंगांची चतुराईने केलेली गुंफण म्हणजे ललितकथा हे त्यांनी सांगितलेले लघु कथेचे तंत्र होय. लघुकथेची सुरुवात, आकर्षक शेवट, परिणामकारक मध्यें गुंतागुंत, `निरगाठ` व `उकल` यांनी उत्कंठावर्धक ही लघुकथेची मुलभूत तत्वे त्यांच्या कथेत आली आहेत. साधी, सोपी, सुटसुटीत भाषाशैली व मार्मिक संवाद, विशिष्ट लय यामुळे त्यांनी लघुकथेच्या बाहयांगात क्रांती केली. मात्र अंतरंग त्यांना वैचित्र्यपूर्ण बनविता आले नाही. त्यांच्या कांही कथातून प्रतीत होणारे जीवनदर्शन अगदी वरवरचे वाटते. म्हणूनच डॉ. अंजली सोमण म्हणतात, "वाङ:मयविषयक दृष्टिकोणामुळे आणि विपुल स्वरुपाच्या चटकदार लेखनामुळे ना.सी. फडक्यांनी मराठी कथेलाच नव्हे तर मराठी साहित्यालाच एका धोकादायक वळणावर आणून ठेवले."[७] फडकेंच्या बोधवादी, स्वप्नरंजनात्मक व पलायनवादी भूमिकेमुळे त्यांच्या कथा एकसुरी, एकांगी बनलेल्या दिसून येतात.

फडके यांनी `कलेसाठी कला` या तत्वाचा पुरस्कार केला तर खांडेकरांनी `जीवनासाठी कला` हे तत्व अंगिकारले. जी कथा केवळ ऐषआरामीचे व कलासक्त

जीवन जगत होती, प्रणयप्रधानता आणि मनोरंजन इतक्या पुरतेच तिचे क्षेत्र मर्यादित होते. ती कथा खांडेकरांच्यामुळे जीवन सन्मुख बनू लागली. तिच्यात भावनोत्कटता अवतरली. जीवनातील संघर्ष अगदी हलक्या हाताने खांडेकरांची कथा हाताळू लागली. त्यांच्या कथा सामाजिक ध्येयवादातून निर्माण झाल्या आहेत. आदर्शाच्या प्रसाधनाने त्यांच्या कथा नटलेल्या आहेत. कथेच्या दालनात त्यांच्या रूपककथेने फार मोठी मोलाची भर घातली आहे. 'श्रीमंतांच्या डोक्यावर संप-तीचा धुर चढला की, गरीबांना चटके बसतात' अशा प्रकारची वाक्ये सर्वत्र विखुरलेली आहेत. अशारीतीने खांडेकर हे सर्वचदृष्टया एक सामान्य लेखक ठरतात. असे असतांना ते लोकप्रिय लेखकही आहेत. त्यामध्ये आश्चर्य करण्यासारखे काहीच नाही. आणि म्हणूनच 'लघुकथा सृष्टीचे अनाभिषिक्त सम्राट' असा त्यांचा गौरव केला गेला आहे.

फडके आणि खांडेकर या आघाडीच्या लेखकांबरोबरच य. गो. जोशी, वि. वि. बोकील, अनंत काणेकर, लक्ष्मणराव सरदेसाई, वरेरकर, कुमार रघुवीर, द. र. कवठेकर इत्यादी किती तरी नामवंत साहित्यिकांची नावे पुढे येतात. प्रत्येकाने आपल्या परीने लघुकथा समृध्द करण्याचा प्रयत्न केला आहे. य. गो. जोशी यांनी मध्यमवर्गीय जीवनातील अनेक कौटुंबिक भावभावनांचे चित्रण जिव्हाळ्याने केले. आई व मुलाचे प्रेम भावा बहिणीचे प्रेम, दीरभावजयीचे प्रेम अशा कौटुंबिक भावनांचा प्रत्यय आणून दिला. पण हे चित्रण अतिरंजित, भडक, भावविवशतेकडे झुकणारे नाही. नव्या सुधारणा, नवे प्रयोग यावर उपहासाचे अस्त्र चालविले आहे. मराठी कथेत स्वत:चे असे एक खास वैशिष्टयपूर्ण स्थान त्यांनी निर्माण केले. "त्यांच्या कथेने तांत्रिकतेच्या बेडया झुगारून दिल्या. व ती स्वत:च्या तंत्राने स्वतंत्रपणे उभी राहिली. म्हणूनच लघुकथेच्या क्षेत्रात य. गो. जोशी यांची कथा वैशिष्टयपूर्ण ठरली आहे."[८] त्यांची कथा त्याग, माणूसकी, उदात्त प्रेम जगू पाहणारी आहे. त्यांच्या 'समोर पाहणारी मुलगी' यासारख्या कथा नवकथेची आठवण करून देतात.

प्रा. श्री. म. माटे यांचे 'उपेक्षितांचे अंतरंग' १९४१ साली प्रसिध्द झाले. आणि उपेक्षितांच्या अंतरंगाचे दर्शन प्रथमच माटे यांनी घडविले. पांढरपेशी कथा बाजूला सारून माटयांनी ग्रामीण जीवनातील दारिद्र्याचे चित्रण केले. म्हणूनच त्यांना 'ग्रामीण मराठी कथेचे अग्रदूत' असे म्हटले आहे. तर डॉ. आनंद यादव म्हणतात " माटे ग्रामीण कथेचे

`हरिभाऊ` म्हटले तर ठोकळ यांना `फडके` म्हणावे लागेल."[९] कारण ना.सी. फडके यांनी मराठी कथेला जे स्वरूप दिले, तेच स्वरूप ग्रामीण कथेला कांही प्रमाणात ग.ल. ठोकळ यांनी दिले. माटे यांच्या बरोबरीनेच ते ग्रामीण कथा लिहित होते. आधुनिक मराठी कादंबरीचे जनकत्व जसे हरिभाऊंच्याकडे जाते, त्या न्यायाने मराठी ग्रामीण कथेचे जनकत्व श्री. म. माटे यांच्याकडे जाते.

नवकथेची अंधुकशी चाहूल वामन चोरघडे यांच्या कथेतून दिसू लागली. लघुकथेचे कोणतेही अंग किंवा कोणत्याही लेखकाची छाप त्यांच्यावर पडली नाही. अबोल त्यागाची प्रीती, कामवासना, काव्यात्मकता आणि खडकाळ वास्तवतेचे चित्रण त्यांनी केले. "फडके आणि खांडेकर यांच्या लेखनामुळे मराठी क्षेत्रात लघुकथेची जी कोंडी निर्माण झाली होती. ती वामन चोरघडे ह्यांनी कांही अंशी फोडली."[१०] असे गौरव उद्‌गार "खडक आणि पाणी" मध्ये गंगाधर गाडगीळांनी काढले आहेत.

इ.स. १९३९ मध्ये दुसरे महायुध्द सुरु झाले आणि महायुध्दाने उध्वस्त केलेल्या जीवनाचे व त्या प्रलयातून बाहेर पडलेल्या माणसांच्या नव्या जाणिवेचे प्रतिबिंब गंगाधर गाडगीळांच्या कथेतून प्रकर्षाने उमटले. गंगाधर गाडगीळ, पु.भा. भावे, अरविंद गोखले आणि व्यंकटेश माडगुळकर हे सारे नवकथाकार आहेत. महायुध्दामुळे माणुसकी लोप पावली, जीवन मुल्यांचा -हास झाला, श्रध्दास्थाने कोसळली. वैफल्ये आणि विकृती यांची दाट छाया तत्कालीन मराठी कथेवर पसरु लागली. मराठी साहित्यातही नवविचारांचे वारे वाहू लागले. मराठी कथेत क्रांतीची चाहूल स्पष्टपणे जाणवू लागली. नव्या आशयाचे अंकुर उगवू लागले. जुन्या लघुकथेचे तंत्र झुगारुन दिले गेले.

१९४० ते १९४५ या कालखंडातील कथा माणसाच्या अंतर्मनाचा वेध घेऊ लागली. मानवी मनात दडलेल्या विविध प्रवृत्तीचे दर्शन घडवू लागली. विभावरी शिरुरकर, य.गो. जोशी, दिवाकर कृष्ण यांनी मानवी मनाचा शोध घेण्याचा प्रयत्न केला. पण तो अस्पष्ट व धूसर होता. चोरघडे, सौ. कुसुमावती देशपांडे यांनी साचेबंद स्पातून बाहेर पडण्याचा प्रयत्न केला. वामन चोरघडेंच्या कथेत भाषेचा, शैलीचा तंत्राचा, अनुभूतीचा स्वतंत्रपणा जाणवतो. तर "कुसुमावतींनी मराठी कथेला

काव्यमयतेचे एक नवीन लेणे प्राप्त करून दिले."[११] असे प्रा. दा. वि. कुलकर्णी म्हणतात म्हणून वामन चोरघडे व कुसुमावती देशपांडे यांनी एका परीने नवकथेची पूर्वतयारी केली. असे म्हणता येईल.

नवकथा म्हणजे एखाद्या व्यक्तिच्या मनातील खळबळ, तिच्या एखाद्या भावस्थितीचे चित्र किंवा निसर्गदृश्याचे सहजतेने केलेले भावनामय चित्रण व क्षुद्र वाटणाऱ्या जीवनातील नाट्य टिपणे होय. नवकथेने पूर्वीच्या कथेतील भावविवषता, उपमा, उत्प्रेक्षांचा फाफटपसारा सुभाषितांची वेळोवेळी होणारी पखरण यांच्या चाकोरीतून मुक्तता केली. "जीवनाच्या वास्तवतेची अधिक मुक्त व लवचिक संकल्पना नवकथेतून दिग्दर्शित झालेली होती."[१२] असे डॉ. सुधा जोशी म्हणतात. `सत्यकथा`, `अभिरूची`, `साहित्य` यासारखी मासिके नवी कथा, नवे काव्य आवर्जुन प्रसिध्द करू लागली. आशय आणि अभिव्यक्तीच्या बाबतीत तिने आमूलाग्र बदल घडवून आणला. "१९४५ च्या सुमारास मराठी कथेत नवतेचे प्रवर्तन झाले."[१३] असे `वाङ:मयीन दृष्टि आणि दृष्टिकोन` या पुस्तकात वा. ल. कुलकर्णी म्हणतात. आणि त्यांचे हे उद्गार सार्थ वाटतात.

आजची मराठी नवकथा जीवनाचे वास्तव, सूक्ष्म आणि विविध पातळ्यावरून व भूमीकांवरून सत्यदर्शन घडवू लागले आहे. तिच्यामध्ये नाविन्य आहे. या नवकथेविषयी भालचंद्र फडके म्हणतात "मनुष्याच्या गुंतागुंतीच्या मनोव्यापाराचा शोध घेत त्याच्या व्यक्तिमत्वाचे रूप ती न्याहाळू लागली. व्यक्तिजीवन आणि समाजजीवन हयांच्या परस्पर संबंधाचे स्वरूप ती व्यक्त करू लागली."[१४] म्हणूनच आजची मराठी कथा गुणवत्तेच्या अनेक पातळ्यावर फुलते आहे. माणसाच्या व्यक्तिमत्वातील विविध पैलू शोधून ती व्यक्त करु लागली आहे.

मराठी नवकथेचे जनक गंगाधर गाडगीळ यांनी आधूनिक जीवनाचे `उध्वस्त विश्व` मानणारी नवकथा निर्माण केली. नवकथाकारात गंगाधर गाडगीळांना अग्रपूजेचा मान द्यायला हवा कारण नवकथेतील सामर्थ्याच्या निष्ठेने जाणिवपूर्वक नवेनवे प्रयोग करून कथेच्या रंगरूपाची कल्पनाच बदलून टाकण्यात गाडगीळ अग्रेसर राहिले आहेत. धक्का देणारा आशय आणि तिरपा आविष्कार हे त्यांच्या कथेचे विशेष होय. गाडगीळ फार थोर कलावंत आहेत आणि म्हणूनच "मराठी नवकथेचे गाडगीळ हे शिल्पकार आहेत."[१५] असे म. द. हातकणंगलेकर म्हणतात.

गंगाधर गाडगीळांनी मराठी कथेला काय दिलं ? याचा विचार करीत असतांना गाडगीळांनी आपला जीवनानुभव कवेत घेऊन त्याला निश्चित आकार व अर्थ देणारी दृष्टी, अनुभवांची असंख्य लेणी, व्यक्तिचे क्ष किरणात्मक चित्रण, कथा प्रकारातील अनेक शक्यतांचा उपयोग भाषेच्या अनेकविध सुप्तशक्तींचा प्रत्यय या गोष्टी गाडगीळांनी मराठी कथेला दिल्या व तिला पिंजऱ्यातून मुक्त करून गगनभरारी मारण्यासाठी पंख दिले. या गुणांनी समृध्द बनलेल्या नवकथेचे गाडगीळ जसे निर्माते आहेत. तसेच तिचे स्वरूप विषद करुन सांगणारे भाष्यकारही आहेत. नवकथेची प्रतिष्ठा वाढविण्यात ते अग्रेसर राहिले आहेत. त्यामुळे मराठी कथासाहित्यात त्यांचे स्थान असाधारण आहे.

अरविंद गोखले यांच्या कथेची प्रकृती गाडगीळ, भावे यांच्या कथेपेक्षा वेगळी आहे. गोखले जीवनातील काव्य आपल्या सूक्ष्म निरीक्षणाने टिपतात. "डॉ. प्रल्हाद वडेर अरविंद गोखले यांना `मूड स्टोरी` कार म्हणतात."[१६] भाववृत्तीचे चित्रण हा त्यांच्या कथांचा विशेष आहे. `मूड` ही भाववृत्ती त्यांना एकदा सापडली व आपल्या शैलीने त्यांनी पकडली की ते कुठे थांबत नाहीत. भाववृत्तीची धुंदी त्यांना चढते. गोखल्यांचे मनोविश्लेषण अतिशय सूक्ष्म आहे. समाजातल्या अनेक थरांतील माणसे ते रंगवितात. ` मंजुळा` या कथेतून मुंबईच्या मध्यम वर्गीयांच्या खोलीतील `रोमान्स` व्यक्त होतो. नाजूकपणा व बारकावा यामुळे त्यांच्या कथेला एक वेगळे सौंदर्य लाभले आहे.

अनेक प्रकारची माणसे व वेगवेगळे प्रसंग त्यांच्या कथेतून येतात. कधी सामाजिक विषय ते हाताळतात, तर कधी स्त्रियांची दु:खे उलगडून दाखवितात. कधी राजाच्या रंगमहालातून वाचकांना फिरवून आणतात. कधी कधी शेतकरी, कामकरी, मजूर यांच्या दु:खापर्यंत वाचकांना पोहोचवितात. गोखल्यांचे अनुभवविश्व अनुभव संपन्न आहे. गोखले पात्रांच्या मनात शिरून कथा लिहितात. म्हणून `व्यक्ती` हा त्यांच्या कथेचा केंद्रबिंदू आहे. गोखलेंच्या कथेबद्दल गंगाधर गाडगीळ म्हणतात. " त्यांच्या कथात जे कांही घडते अगर जी माणसे येतात त्यांच्याकडे ते कुठल्यातरी पात्राच्या मनातून पाहत असतात. जिथे अनुभवाचे संस्कार होतात, जिथे जीवन अखेर जगले जाते, तिथेच गोखले प्रवेश करतात, आणि

तिथले स्पंदन, तिथल्या विचारांच्या आणि विकारांच्या लहरी अचूकपणे वाचकांजवळ नेऊन पोहोचवतात, हयामुळे त्यांची सारी कथा अनुभवनिष्ठ असते. मराठी लघुकथेच्या स्वरूपात हा मोठा बदल झालेला आहे, आणि त्याबद्दलच्या श्रेयाचा हा एक महत्त्वाचा वाटा अरविंद गोखले त्यांच्याकडे जातो."[१७] यावरून गोखले अनुभवनिष्ठ आहेत असे दिसून येते.

पु.भा.भावे यांनी उद्दामभावना व प्रभावी भाषा यातून आपले कथाविश्व फुलविले आहे. भावे यांची कथा `नवकथा` म्हणून संबोधिली जात असली तरी त्यांच्या कथेने जुन्या आणि नव्या दोन्ही कथांशी आपले नाते जोडले जुन्या कथेचे रूप पोटात घेऊन त्यांची कथा नव्या कथेचे रूप घेते. "जुन्या परंपरागत जीवनमूल्यांबद्दल आदर आणि नव्या सुधारणाबद्दल व संस्कृतीबद्दल तिरस्कार"[१८]असे अ. ना. देशपांडे म्हणतात. कुठल्याही मर्यादेत त्यांनी आपल्या कथेला जखडून ठेवले नाही. `स्वप्न`, `ध्यास`, `माणुसकीच्या मर्यादा` या कथेतून परंपरागत जीवनमूल्यावरील श्रध्दा आढळते. `स्वप्न` मधील नायक प्रेमभंग झाल्यावरही बदफैली जीवन जगतो. व्यक्तींच्या विशिष्ट अवस्थेचे रसोत्कट चित्र रेखाटण्याचे असाधारण कसब भावे यांनी हस्तगत केले आहे.

भावे यांनी अनेक उत्कट प्रेमकथा लिहिल्या आहेत. बहुधा त्यांच्या कथेत स्त्री ही शिकारी असते. आणि पुरुषाची शोकांतिका होते. `सतरावे वर्ष` मधील बबनच्या मनात प्रेमाचा अंकुर फुटतो. व प्रेम आणि वैषयिक तांडव चालते याचे सुंदर चित्रण आणि उन्मादाच्या भरात असलेल्या पस्तीशीच्या सुशिलाबाईचे चित्रण अत्यंत कोमल हाताने रंगविले आहे. कामवासना व प्रीती यांचे समाजात असणारे स्थान, समाजातील ढोंग, खोटेपणा, चोरटेपणा, यांचे चित्रण भाव्यांच्या कथातून परिणामकारक रीतीने केलेले आढळते.

भाव्यांच्या कथेचे स्वरूप विविधतेने नटलेले आहे. कधी त्यांच्या कथेत काव्यात्म वृत्तीचा फुलोरा फुललेला आढळेल, कधी प्रणयाची भावना आढळेल, तर कधी मनोविश्लेषणात सूक्ष्मता आढळेल. त्यांच्या कथेत क्वचित पाल्हाळ, पुनरुक्ती आणि कधी अतिरंजितताही आढळेल. त्याचबरोबर सकस भाषाशैलीही आढळेल. सदानंद रेगे, दि. बा. मोकाशी यांनी ही कथेच्या विकासाच्या टप्प्यात आपले अस्तित्व निर्माण करून ठेवले आहे.

व्यंकटेश माडगूळकरांनी ग्रामीण जीवनाच्या वातावरणांत पूर्णपणे मुरलेली स्वत:च्या अनुभवाशी इमान राखणारी अस्सल जातिवंत ग्रामीण कथा लिहिली. त्यांनी ग्रामीण कथेला वेगळ्या वाटने नेले. त्यांच्या पूर्वी र. वा. दिघे, ग. ल. ठोकळ, श्री. म. माटे आणि चि. य. मराठे यांनी ग्रामीण जीवन आपल्या कथातून रंगविले होते, पण त्यांनी शहरी चष्म्यांतूनच ग्रामीण जीवनाकडे पाहिले.

नवकथेत व्यक्ती हेच कथाकाराच्या संशोधनाचे प्रमुख केंद्र बनले. व्यक्तीच्या संदर्भात सामाजिक जाणिवा आणि जीवनातील मूल्य रंगविली जाऊ लागली. यादृष्टीने 'माणदेशी माणसां' चे दर्शन घडविणारे माडगूळकर यांनी आपल्या कथांतून निराळी सृष्टी उभी केली आहे. त्यांची लघुकथा माणदेशच्या अस्सल कसदार मातीतून निर्माण झाली आहे. माणगंगेच्या परिसरातील व्यक्तिंचे दारिद्र्य त्यांचा भोळेपणा त्यांची कणखर वृत्ती त्यांचा आडाणीपणा आणि विकार सुलभता त्यांच्या समजूती आणि त्यांच्या मनातील मानवतेचा अंश याचे दर्शन त्यांनी आपल्या कथाविश्वात परिणामकारकपणे घडविले आहे. त्यांच्या कथातून निरनिराळ्या प्रवृत्तीची माणसे भेटतात. सृष्ट, दुष्ट, भोळी, धूर्त, कष्टाळू, इमानी, बदमाश, कामचोर, लोभी, उन्मत्त अशा सर्व प्रकारच्या माणसांनी त्यांच्या कथेचे विश्व गजबजलेले आहे. अन्नाला मोताद झालेला इमानी धर्मारामोशी ' बक-यावाणी पालापाचोळा खाऊन जगतो,' तर ' जलमभर दळिंद्री राहून अमी मसणवाटाला जायाचं' असे आर्त उदगार काढून देवाला जाब विचारणारा रामा मैलकुली, इमानाने गावची चाकरी करणारा देवा सखा महार, अजाण, भाबडी, कमळी आणि उनाड , ढालगज गोकुळाही आहे. त्याचबरोबर स्वत:चे व्यक्तिमत्व असलेली गाढवे, कुत्री, मेंढरं ही मुकी जनावारेही आहेत. अगदी थोडया शब्दांच्या सहाय्याने त्या त्या व्यक्तिंचे चित्र वाचकासमोर उभे करण्याचे माडगूळकरांचे कौशल्य अपूर्व आहे. म्हणूनच मधु कुलकर्णी म्हणतात - " आशय आणि अभिव्यक्ति यांची मुत बनविण्यात व्यंकटेश माडगूळकर यशस्वी झाले. ग्रामीण लेखन ग्रामीण कथा ख-या अर्थाने मराठीत समर्थपणे व्यक्त केली ती व्यंकटेश माडगूळकरांनीच." [१९] माडगूळकरांच्या वरील विवेचनाचा विचार करता हे उदगार योग्य असेच आहेत.

माडगूळकरांनी ग्रामीण कथेला अद्‌भूतरम्यतेच्या पातळीवरून वास्तव पातळीवर आणले. आणि माणदेशच्या परिसरातील जीवनाचे वेगवेगळे रंग व्यक्तिचित्रांच्याव्दारे आपल्या कथांतून रंगविले आहेत. गोखले, भावे, गाडगीळ यांच्यापेक्षा त्यांच्या भाषेचे स्वरूप, रचना निवेदनशैली, भाषाशैली सर्व कांही वेगळे आहे. साधेपणा, साधी, सोपी भाषाशैली, ठसठशीत व्यक्तिचित्रे मानवी जीवनातील कारूण्य अशी अनेक वैशिष्टये त्यांच्या कथातून आढळून येतात.

गाडगीळ , भावे, गोखले, माडगूळकर यांनी जे कार्य केले ते महत्वाचे ठरते. १९४५ नंतरची नवकथा ही लघुकथेच्या विकाससंक्रमणातील अत्यंत भूषणावह आहे. तिचे पोषण करण्याचे श्रेय मुख्यत: या चौघा लेखकांचेच आहे. या ही पूर्वी विभावरी शिरुरकर कृष्णाबाई, कमलाबाई टिळक, य. गो. जोशी, वामन चोरघडे कुसुमावती देशपांडे ईत्यादिकांच्या कथातून नवकथेची कांही प्रसादचिन्हे अत्यंत विलोभनीय स्वरूपात प्रगट झालेली होती. आधीच्या या लेखक – लेखिकांचे कथा वाङ्‌मय आत्मश्रध्देपासून मात्र अलिप्त होते.

मराठी कथेची वाटचाल पाहत असताना स्त्री कथालेखिकांनी मराठी लघुकथा विकासाच्या क्षेत्रात मोलाची कामगिरी केली आहे. त्यांचे मराठी कथा-क्षेत्रातील योगदान महत्वपूर्ण आहे. हे प्रथम लक्षात घ्यावे लागते. गोष्ट, स्फुटगोष्ट, लघुकथा, नवकथा या कथावाङ्‌मय प्रकाराने त्या त्या कालखंडातील बदलत्या कथा आणि कथाकारांचा परामर्श घेतल्यानंतर स्त्री कथालेखिकांचे मराठी कथेतील स्थान अभ्यासणे आवश्यक आहे.

' करमणूक ' व ' मनोरंजन ' या कालखंडात कांही क्वचित स्त्रियांनी लेखन केले आहे. या कालखंडात स्त्री विषयक दृष्टिकोण बदलला स्त्री शिक्षण स्त्रियांची उन्नती यांसारख्या प्रश्नांकडे ' मनोरंजन ' ने लक्ष वेधले. ' माजघरात ' असलेली स्त्री हळूहळू दिवाणखान्यात येऊ लागली. पुरूषाबरोबर धिटाईने वाट चालू लागली. ' यशवंत ' , ' किर्लोस्कर ' या कालखंडात काशिबाई कानेटकर, गिरजाबाई केळकर, आनंदीबाई शिर्के इत्यादी प्रमुख लेखिका उदयास आल्या. १८९६ मध्ये

स्त्रियांचे कथालेखन सुरु झाले असले तरी स्त्रीने लिहिलेल्या कथांचा संग्रह प्रसिध्द होण्यासाठी १९१५ साल उजाडले. डॉ. अंजली सोमण म्हणतात त्याप्रमाणे - " शांताबाई या लेखिकेने लिहिलेली ' बिचारी आनंदीबाई ' ( मासिक मनोरंजन नोव्हेंबर - डिसेंबर जोडअंक १८९६ ) ही कथा म्हणजे स्त्रीने लिहिलेल्या उपलब्ध कथांतील पहिली कथा होय. "[२०] या शिर्षकातून स्त्रीचे दुःख व तिची परवशता जाणवते.

करमणूक, मनोरंजन, नवयुग या नियतकालिकांचा स्त्रियांकडे व त्यांच्या प्रश्नांकडे पाहण्याचा दृष्टिकोण सहानुभूतीचा होता. सुवासिनी, लीला, काशीबाई हिर्लेकर वामनसुता, लक्ष्मीतनया, हिराबाई पेडणेकर, ताराबाई तर्खड, लक्ष्मीबाई टिळक, काशीबाई देवधर, आनंदीबाई देशमुख इत्यादी कितीतरी नावे कथालेखिका म्हणून उजेडात आली. पण स्त्रिया उशिरा का लेखन करायला लागल्या किंवा विशिष्टपध्दतीनेच लेखन का करतात ? या प्रश्नांचा मागोवा सामाजिक विचारांचे व सुधारणावादी सामाजिक कृतींना महत्व देणारे होते. या कालखंडातील कथातून सामाजिक समस्यांचा ऊहापोह केलेला दिसतो.

इ.स. १८६० ते १९०० या काळात सामाजिक सुधारणा करण्याचे प्रयत्न झाले. म. जोतीबा फुले यांनी पुण्यात मुलींसाठी शाळा काढली. बालहत्या प्रतिबंधक गृहाची स्थापणा केली. लोकहितवादींनी ' शतपत्रा ' तून स्त्री - शिक्षण, विधवा-विवाह या विषयावर मत मांडण्यास प्रारंभ केला. या कालखंडातील सामाजिक इतिहास प्रबोधनाला स्थान देणारा होता. त्यामुळेच या काळातील साहित्य-कांना सामाजिक सुधारणांची चर्चा आपल्या साहित्यातून करणे आवश्यक वाटले. या कालखंडातील कथालेखिका ज्या " कौटुंबिक वातावरणात वावरल्या, वाढल्या होत्या ते वातावरण पारंपारिक होते. त्यावर सुधारणावादाचा म्हणावा तसा पगडा नव्हता. कुटुंबात जे परंपरागत समजूती व अंधश्रध्दांचे वर्चस्व होते. तेच त्यांच्या कथा लेखनातून अपरिहार्यपणे अवतरत होते. "[२१] असे अंजली सोमण यांनी म्हटले आहे.

१९२० पर्यंतचा काळ स्त्रीजीवनाच्या दृष्टीने संघर्षमय होता. शिक्षण घेताना, माजघरातून घराचा उंबरठा ओलांडताना, जुन्या रूढी मोडून पुढे जाताना स्त्रियांना संघर्ष करावा लागला. पण पुढे मात्र स्त्री शिक्षणाचा प्रसार वाढला. सामाजिक परिस्थिती बदलली व स्त्रियांचे कथासंग्रह मोठया प्रमाणावर प्रकाशित होऊ लागले. काशिबाई कानेटकर व गिरिजाबाई केळकर या त्या काळात कथालेखन करणा-या महत्वाच्या स्त्रिया होत.

१९२५ ते १९३५ या काळात अनेक स्त्री लेखिकांनी कथालेखन करण्यात आघाडी मारली. ' कळयांचे निःश्वास ' मध्ये विभावरी शिरूरकरांनी स्त्रियांच्या जीवनातील प्रखर समस्या, त्यांचे मनोविश्लेषण, त्यांच्या व्यथा आणि स्त्रिच्या मुक्या मनाला हळूवारपणे कथन करायला लावल्या. सौ. कुसुमावती देशपांडे यांनी पांढरपेश्या वर्गाला बाजूला ठेवून श्रमजीवी वर्गाचे चित्र उभे केले. त्यांच्या कथेतून मानवी जीवनाचे व्यापक दर्शन काव्यात्मरितीने केलेले आढळते. सूक्ष्म व मनोज्ञ रेखाटनामुळे त्यांची कथा सौंदर्याचा व कलात्मक दृष्टीचा साक्षात्कार वाचकाला देते. " स्वतःचे असे एक खास स्थान मराठी लघुकथेत सौ. कुसुमावती देशपांडे यांनी निर्माण केले. "[२२] असे जान्हवी संत म्हणतात.

कमला फडके , शांता शेळके, इंदिरा संत, वसुंधरा पटवर्धन , डॉ. सरोजिनी बाबर यांच्या कथेत रंजकता हाच आत्मा आहे. पण स्वतःचे असे एक स्वतंत्र व्यक्तिमत्व त्यांच्या कथेतून प्रत्ययास येते. डॉ. सरोजिनी बाबर यांनी आपल्या कथेला ग्रामीण भागाचे दर्शन घडविले आहे. स्त्रियांची सुखदुःखे त्यांचे जीवन, चालिरिती यांचे मार्मिक दर्शन आपल्या कथातून घडविले आहे. ' मला जे लिहावस वाटलं ते प्रामाणिकपणानं कथांच्या रूपानं लिहिले आहे. ' अशी भूमिका घेऊन त्यांनी लेखन केले आहे. शांता शेळके , इंदिरा संत यांच्या कथेतून स्त्री जीवनांतील समस्या काव्यमय रितीने मांडल्या आहेत.

नवकथा उदयाच्या काळात अनेक स्त्रियांनी कथालेखन केले. मात्र ते नवकथेच्या पध्दतीचे नव्हते. वसुंधरा पटवर्धन यांच्या कथा स्त्रीच्या भावजीवनाशी

निगडीत आहेत. 'स्त्री', 'सरल', 'घर' इत्यादी कथांत स्त्रियांच्या दु:खाचे चित्रण आहे. शिरीष पै यांच्या कथा व्यक्तिप्रधान असून काव्यात्म वृत्तीचा प्रत्यय त्यांच्या कथातून येतो. " वसुंधरा पटवर्धन व शिरीष पै या दोन लेखिकांचे अपवाद वगळता या कालखंडाने फारशा चांगल्या कथालेखिका निर्माण केल्या नाहीत. वसुंधरा पटवर्धन व शिरीष पै यांचे कथालेखन चांगले असले तरी नवकथेच्या संकल्पनेशी जुळणारे नव्हते. "२३ असे डॉ. अंजली सोमण म्हणतात. या दोन लेखिकांखेरीज कमला फडके, स्नेहलता, दसनूरकर, योगिनी जोगळेकर, सुमती क्षेत्रमाडे, सुशिला चिकटे या लेखिका स्वत:चे वैशिष्टयपूर्ण स्थान निर्माण करु शकल्या नाहीत.

स्त्रियांचे अनुभव स्त्रियाच मांडू शकतात असा आत्मविश्वास तिच्यात आल्यावर किंवा पुरुषप्रधान समाजव्यवस्थेचे दर्शन स्त्रियाच करु शकतात. असा स्त्रीवादी समिक्षेने आग्रह धरला. त्यानंतर मराठी समीक्षा व्यवहारात' स्त्रीवादी समीक्षे' ला समाविष्ट केले गेले. " आपल्या स्वत:चा शोध घेणारी आधुनिक 'स्त्री' 'स्त्री' त्याचा अर्थ अनेक अंगाणी उलगडून पाहते. असे दिसून येते. "२४ असे सुधा जोशी म्हणतात. यानंतर कांही स्त्री लेखिका आता स्त्रीवादी दृष्टिकोणातून बोलू, पाहू, लिहू लागल्या आहेत. मराठीतील स्त्रियांची कथा मुख्य प्रवाहाबरोबर सुसंगत व समांनतर वाहत गेली. स्त्री जीवनांतील, व्यवहारातील, विविध, अनुभव मराठीतील कांही चांगल्या लेखिकांनी मांडले. आणि मराठी कथेला विकसित करण्यास हातभार लावला.

नवकथाकारांच्या आध शिल्पकारानंतर शंकर पाटील द. मा. मिरासदार, जी. ए. कुलकर्णी, श्री. दा. पानवलकर, दिलीप चित्रे या लेखकांबरोबरच कमल देसाई, सरिता पदकी व यानंतरच्या पिढीतील आनंद यादव रा. रं. बोराडे, विजया राजाध्यक्ष, सुधा नरवणे, वसुधा पाटील इत्यादींची नावे प्रामुख्याने येतात. साठ नंतरच्या पिढीने कथेकडे गंभीरपणे लक्ष वेधले. मराठी कथेच्या आघाडीवर आता स्त्रियाही मागे नाहीत. याचा प्रत्यय या नव्या पिढीच्या अपौरुष कथा

वाचताना येऊ लागला. महायुद्धोत्तर कथेला जे नवे सामर्थ्य प्राप्त झाले त्याचे अस्पष्ट रूप स्त्रीयाच्या कथालेखनातून जाणवते. १९६० नंतर विजया राजाध्यक्ष, कमल देसाई वसुधा, पाटील , गौरी देशपांडे, अंबिका सरकार, सानिया इत्यादी अपवाद सोडले तर ब-याच लेखिका उत्साहाने कथालेखन करताना दिसतात.

१९६० नंतर आशय आणि अभिव्यक्ती या दोन्ही दृष्टीनी मराठी कथा समृध्द करण्यात पुरुष – कथाकारांइतकेच कमल देसाई, विजया राजाध्यक्ष सरिता पदकी, तारा वनारसे व वसुधा पाटील या स्त्री लेखिकांचा प्रामुख्याने उल्लेख करावा लागेल. कमल देसाई यांच्या कथेतून माणसाचे एकाकीपण आणि जीवनातील अर्थशून्यता अशी अनेक रूपे त्यांच्या कथेतून व्यक्त होतात. त्यांच्या कांही कथांना तरल व सूक्ष्म घाट लाभलेला आहे. त्यांनी घेतलेली झेप विलक्षण आहे. " मराठी नवकथेचे जे सामर्थ्य – आशयाची सूक्ष्मातिशयता व अभिव्यक्तीतील तरलपणा – हे त्यांच्या कथातून विलक्षण प्रभावाने जाणवते. " २५ म्हणून संवेदनांच्या आधारे कथेतील आशय त्या मूर्त करीत जातात. ' बाई, सव्वा घंटा झाल्या ' हया कथेतून अनेक पात्रांना वेगवेगळा आकार देताना त्यांच्या संवेदना प्रगट होतात. जीवनातील किरटेपणाची भेदक जाणीव त्यांच्या कथेतून व्यक्त होते.

विजया राजाध्यक्ष यांच्या कथा वाचतांना अस्पष्ट, धूसर जगाचे दर्शन घडते. विजयाबाई च्या कथातील अनुभव सूक्ष्म आहेत. स्त्री पुरुष संबंधाचे वेगवेगळ्या पातळीवरील चित्रण त्या सहजपणे करतात. स्त्री – पुरुष विषयक नात्याचा शोध त्या घेतात . त्यांच्या कथा सृष्टीत एकमेकांवर प्रेम करणारे स्त्री-पुरुष क्वचितच लग्न करताना दिसतात. देह देहाचे वासना धर्म, प्रौढ स्त्रीची समागमोत्तर स्थिती, पुरुषाची समागमासाठी झालेली आतुरता इत्यादी भोवती त्यांच्या बहुसंख्य कथांची निर्मिती होते. विजयाबाईंची कथा स्त्री समस्येकडे व त्यांच्या दु:खाकडे मोकळे पणाने पाहते. कुटुंबात अनेक प्रकारे

आढळणाऱ्या दु:खाचा मागोवा त्या घेतात. त्यातून त्यांच्या कथेतील स्त्री तिचे स्वतंत्र रूप- रंग घेऊन साकार होते. म्हणूनच " स्त्रीच्या भावजीवनाला विशेषत: तिला व्यथित करणाऱ्या हळुवार दु:खाला त्यांच्या कथेत महत्त्वाचे स्थान असते. "[२६] असे म्हणता येईल.

सरिता पदकी यांच्या कथेतील अनुभव ठिणगीप्रमाणे चमकतो. व तेजाची निशाणी मागे ठेवून जातो. स्त्रीचे दु:ख चित्रित करण्यात त्यांना रस आहे. स्त्रीच्या दु:खाचे विविध पदर त्या दाखवितात. त्यांच्या कथाविषयी दि. के. बेडेकर म्हणतात, ' स्वच्छ सारवलेल्या अंगणात लहानमोठ्या रांगोळ्या काढलेल्या असाव्यात तशा या कथा आहेत. म्हणून त्यांचे लेखन मोजके असले तरी कथेच्या इतिहासात महत्त्वपूर्ण ठरते. तारा वनारसे यांच्या कथेतील स्त्री स्वतंत्र रूप घेऊन साकार होते. ' विजेचे दिवे', ' पशू' या सारख्या कथातून घडलेले स्त्रीमनाचे दर्शन स्त्री जीवनाचे अनेक पैलू दाखवितात. नायिकांच्या व्यथा संवेदनक्षम मनातून निर्माण झाल्या आहेत. याची जाणीव होते.

नव्या दमाने आणि नव्या जाणिवेने लेखन करणाऱ्या लेखिकांमध्ये विशेषत्वाने वसुधा पाटील यांचा उल्लेख करावा लागेल. वसुधा पाटील केवळ कौतुकाच्या अपेक्षेने स्त्री कथेच्या दालनात उतरल्या नाहीत तर त्यातून त्यांचे व्यक्तिमत्त्व प्रगट होते आहे. सामाजिक जीवनाच्या व स्त्रीजीवनाच्या कक्षा त्या उजळून टीकीत आहेत. कथेला एक वेगळा, नविन घाट आणण्याचा प्रयत्न वसुधाबाईंनी केलेला जाणवतो.

वसुधा पाटील यांचे कथा वाङ्मयातील योगदान महत्त्वाचे आहे. " मराठीतील सर्वच स्त्री - कथाकारांचे लेखन अव्वल दर्जाचे आहे असे नाही. पण ज्यांचे लेखन अव्वल दर्जाचे आहे. त्यांच्या कथा साहित्याचीही मराठी समीक्षेने योग्य ती दखल घेतलेली नाही. " [२७] असे डॉ. अंजली सोमण म्हणतात. आणि त्यांचे हे म्हणणे योग्य वाटते. कारण शतकांच्या वाटचालीत स्त्रियानी केलेले योगदान जसे महत्त्वाचे आहे. तसे वसुधा पाटील यांचे कथालेखनही महत्त्वाचे आहे.

अगदी सुरुवातीला लिहिलेल्या ' बिचारी आनंदीबाई ' या पहिल्या शांताबाईंच्या कथेपासून ते नवकथा ..... यांचा परामर्श घेत असताना यामध्ये स्त्री कथालेखिकांनी उचललेले पाऊल कौतुकास्पद असेच आहे. यामध्ये दुर्गा भागवत, डॉ. सरोजिनी बाबर, कमलाबाई देशपांडे, विजया राजाध्यक्ष, गौरी देशपांडे, तारा वनारसे, सरिता पदकी, सुधा नरवणे, जोत्स्ना देवधर, शैलजा राजे अशा स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर काळात कथालेखन करणाऱ्या स्त्रियांची संख्या विपुल आहे. या स्त्री कथा लेखिकांची मराठी समीक्षेने थोडी बहुत का असेना दखल घेतलेली आहे. पण १९६० नंतर नव्या जाणिवा घेऊन कसदारपणे आपल्याला आलेले अनुभव कथारूपात मांडणाऱ्या वसुधा पाटील यांची फारशी दखल मराठी समीक्षेने घेतलेली जाणवत नाही. त्यांच्या ' जमुना के तीर ' आणि ' वेगळी ' या कथा संग्रहांना ' महाराष्ट्र शासन पुरस्कार ' मिळूनसुध्दा त्यांची दखल घेतलेली आढळली नाही. थोडा बहुत फुटकळ स्वरूपात भालचंद्र फडके, म. द. हातकणंगलेकर, प्रल्हाद वडेर, म. ना. अदवंत यांनी विचार केलेला आहे. म्हणून मी ' श्रीमती वसुधा पाटील यांच्या कथा लेखनाची वैशिष्टये ' या लघुप्रबंधिकेतून त्यांच्या कथालेखनाची वैशिष्टये 'जमुना के तीर ' व ' वेगळी ' या कथा संग्रहांच्या अनुषंगाने अभ्यासणार आहे.

## संदर्भ


| अ.नं. | लेखकाचे नांव | ग्रंथ व नियतकालिके | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| १) | डॉ. जोशी प्रल्हाद नरहर | आदर्श मराठी शब्दकोश<br>प्र.आ. १९७० | १२७ |
| २) | प्रा. फडके ना.सी. | लघुकथालेखन : मंत्र आणि तंत्र<br>प्र.आ. ऑगस्ट १९५२ | २७ |
| ३) | कुलकर्णी अनिरुध्द अनंत<br>(संपा) | प्रदक्षिणा खंड पहिला<br>सहावी आवृत्ती १९७६ | १०२ |
| ४) | शेवडे इंदुमती | मराठी कथा उद्गम आणि<br>विकास | १५५ |
| ५) | संत जान्हवी<br>जोशी छाया | अर्वाचीन साहित्य समालोचन<br>तृतीयावृत्ती जानेवारी १९९० | १६८ |
| ६) | तत्रैव | तत्रैव | १७५ |
| ७) | डॉ. सोमण अंजली | मराठी कथेची स्थितीगती<br>प्र.आ. १९५५ | ३३ |
| ८) | प्रा. कुलकर्णी दा.वि. | मराठी कथा : स्वरुप आणि आकार | २७० |
| ९) | डॉ. यादव आनंद | ग्रामीण साहित्य :<br>स्वरुप आणि समस्या<br>व्दितीयवृत्ती-१९८४ | १४ |
| १०) | गाडगीळ गंगाधर | खडक आणि पाणी<br>प्र.आ. डिसेंबर, १९६० | १५५ |
| ११) | प्रा. कुलकर्णी दा.वि. | मराठी कथा : स्वरुप आणि<br>आकार | ३०३ |
| १२) | डॉ. देशपांडे वि.भा. (संपा.)<br>डॉ. सावरे स्नेहल | मराठी भाषा आणि साहित्य | ४६ |

## संदर्भ



| अ.नं. | लेखकाचे नांव | ग्रंथ व नियतकालिके | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| १३) | कुलकर्णी वा.ल. | वाङ्मयीन दृष्टी आणि दृष्टिकोन<br>प्र.आ. सप्टेंबर १९५९ | ११९ |
| १४) | दावतार वसंत केशव | आलोचना<br>नोव्हेंबर १९७२ | १७ |
| १५) | हातकणंगलेकर म.द. | मराठी कथा: रुप आणि परिसर<br>प्र.आ. मार्च १९८६ | २१ |
| १६) | डॉ. वडेर प्रल्हाद | आशय आणि अविष्कार<br>प्र.आ. मार्च १९८८ | १०७ |
| १७) | गाडगीळ गंगाधर | खडक आणि पाणी<br>प्र.आ. डिसेंबर १९६० | १६० |
| १८) | देशपांडे अ.ना. | आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास<br>(भाग - दुसरा)<br>प्र.आ. जानेवारी १९५८ | ४७२ |
| १९) | कुलकर्णी मधु | ललित साहित्यातील जडणघडण | १२२ |
| २०) | डॉ. सोमण अंजली | साहित्य आणि सामाजिक संदर्भ<br>प्र.आवृत्ती १९८९ | २९ |
| २१) | तत्रैव | तत्रैव | ३२ |
| २२) | संत जान्हवी<br>जोशी छाया | अर्वाचीन साहित्य समालोचन<br>तृतीयावृत्ती :जानेवारी १९९० | १९३ |
| २३) | सोमण अंजली | मराठी कथेची स्थितीगती<br>प्र.आ. १९५५ | १२९ |
| २४) | डॉ. देशपांडे वि.भा.<br>(संपा.)<br>डॉ. तावरे स्नेहल | मराठी भाषा आणि साहित्य<br>प्र.आ.सप्टेंबर १९९० | ४२ |

संदर्भ

| अ. नं. | लेखकाचे नांव | ग्रंथ व नियतकालिके | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| २५) | कुलकर्णी अनिरुध्द अनंत | प्रदक्षिणा-खंड पहिला<br>सहावी आवृ-ती-१९७६ | १९४ |
| २६) | सोमण अंजली | मराठी कथेची स्थितीगती<br>प्र. आ. १९५५ | १३२ |
| २७) | तत्रैव | तत्रैव | १०० |

...